# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** हिंगोली **P.S.(ठाणे):** गोरेगांव
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0093 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 13/05/2026 20:12

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 13/05/2026
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 13/05/2026
**Time From (वेळेपासून):** 11:39 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 13/05/2026 **Time (वेळ):** 19:40 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 019
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 13/05/2026 19:40 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** मौजे गोरेगाव येथे अतिथी बारवर,सेनगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सुलभा भ्र प्रल्हाद राऊत

(b) **Husband's Name (पती चे नाव) :** भ्र प्रल्हाद राऊत

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1983

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ला लु प्र वि हिंगोली ,हिंगोली ,हिंगोली शहर,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ला लु प्र वि हिंगोली ,हिंगोली ,हिंगोली शहर,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9922061123

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रामप्रसाद ज्ञानबाराव खिल्लारी | | वडील का नाम : ज्ञानबाराव खिल्लारी | 1. ग्राम पंचायत सवना,सेनगाव, गोरेगांव,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | पाचशे रुपये दराच्या 05 नोटा | 2,500.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

2,500.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

सरकार तर्फे फिर्याद                    ला.प्र.वि.कार्यालय हिंगोली.
                                        दिनांक 13/05/2026

मी, सुलभा प्रल्हाद राउत, वय 43 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली मो.नं. 9922061123

सरकार तर्फे फिर्यादी होऊन फिर्याद देते की,मी वरील प्रमाणे असुन,24 फेब्रुवारी 2026 पासून पोलीस निरीक्षक म्हणुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली येथे नेमणूकीस आहे.मी दिनांक 12.05.2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय हिंगोली येथे हजर असतांना तक्रारदार श्री किसनराव प्रितमराव नायक, वय 60 वर्ष व्यवसाय शेती रा.सवना ता.सेनगाव जि.हिंगोली यांनी तक्रार दिली की, माझे घरकुल सन 2025-2026 मध्ये मंजुर झाले असुन मला घरकुलाचा पहिला हप्ता मागील तीन महिण्यापुर्वी 15,000/- रुपये मिळाला आहे व दुसरा हप्ता एक महिण्यापुर्वी 70,000/-रुपये मिळाला होता. तर घरकुलाचा तिसरा हप्ता मिळणे बाकी आहे. त्याकरीता घरकुलाचा संयुक्त पाहणी अहवालावर ग्रामसेवक रामप्रसाद खिल्लारी यांची स्वाक्षरी बाकी आहे अशा स्वरुपाचे काम प्रलंबित आहे. त्याकरीता मी काल दिनांक 11.05.2026रोजी माझे मोबाईल क्रमांक 8329121658वरून रामप्रसाद खिल्लारी, ग्रामसेवक यांचे मोबाईल क्रमांक 9130425578 वर बोललो असता त्यांनी तुमच्या संयुक्त पाहणी अहवालावर स्वाक्षरी करण्यासाठी 5,000/-रुपये लागतील.तरच तुमचे काम करतो नाही तर कोठेही जा असे म्हाणाले होते. त्यानंतर मी आज दिनांक 12.05.2026 रोजी माझे घरकुलाचे कामासाठी ग्रामसेवक खिल्लारी यांचे घरी गोरेगाव येथे गेलो असता त्यांची भेट झाली नाही. माझे घरकुलाचे काम ग्रामसेवक रामप्रसाद खिल्लारी, सवणा यांचेकडे प्रलंबीत आहे.मी आज त्यांना मोबाईलव्दारे संपर्क केला असता त्यांचा मोबाईल बंद आहे.मी त्यांना उदया दि.13.05.2026 रोजी सकाळी गोरेगाव येथे त्यांची घरी जावुन भेट घेणार आहे.माझे कामासंबंधाने बोलणी करणार आहे.मी माझेकडील प्रलंबीत कामाचे अनुशंगाने घरकुल संयुक्त पाहणी अहवालाची झेरॉक्स प्रत माहितीस्तव या अर्जासोबत देत आहे.तरी माझे संयुक्त पाहणी अहवालावर ग्रामसेवक रामप्रसाद खिल्लारी यांची स्वाक्षरी करण्यासाठी त्यांनी माझेकडे 5,000/-रुपये ची मागणी केली आहे.सदर रक्कम ही लाच असल्याची माझी खात्री आहे. सदरची लाच रक्कम 5,000/- रुपये मला त्यांना देण्याची इच्छा नाही. त्यामुळे त्यांचेवर योग्य ती कारवाई करावी ही विंनती आहे.

माझेत व ग्रामसेवक रामप्रसाद खिल्लारी यांचेत कोणताही आर्थीक व्यवहार नाही. तथा आमचेमध्ये कोणताही सदर कामाचे व्यतिरीक्त कोणताही आर्थिक व्यवहार झालेला नाही. तसेच त्यांच्याशी माझी कोणत्याही प्रकारची दुष्मनी नाही. मला लिहीता वाचता येत नाही मी माझा पुतण्या राजेश दत्तराव नायक यांचे सोबत येवुन तोंडी तक्रार देत आहे. संबंधीत व्यक्तीवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी अशा आशयाची तक्रार दिली होती.

सदर तक्रारी वरुन कारवाईचे अनुशंगाने मा.कार्यकारी अभियंता,लघु पाटबंधारे विभाग हिंगोली यांना दिलेल्या लेखी पत्रकान्वये त्यांनी त्यांचे कार्यालयाचे पंच 1) श्री प्रशांत कृष्णा खिल्लारे,वय31वर्ष पद-शिपाई,गट-ड,लघु पाटबंधारे उप विभाग, हिंगोली (सव्हेशन) ता.जि.हिंगोली रा.भगीरथ नगर नांदेड ता.नांदेड जि.नांदेड 2) श्री संतोश काळुराव वानखेडे, वय 37 वर्ष पद-आनुरेखक, गट- क,लघु पाटबंधारे उपविभाग, औंढा नागनाथ.जि.हिंगोली रा. येवती ता.रिसोड जि.वाशिम असे ला.प्र.वि.हिंगोली कार्यालयात हजर आले.

दि.12.05.2026रोजी लाप्रवि कार्यालय हिंगोली येथे तक्रारदार व वर नमुद दोन्ही पंच हजर असताना यातील तक्रारदार यांनी त्यांची तक्रार पंचासमक्ष तोंडी कथन केली.त्यानंतर सदरची तक्रार तक्रारदार यांनी तोंडी सांगितली त्यावरून संगणकावर टंकलिखीत केली असुन तक्रारदार यांनी दिलेली तक्रार पंचानी वाचुन पाहिली.तक्रारदार यांची तोंडी कथन केलेली तक्रार व लेखी तक्रार एकच असल्याचे खात्री झाल्याने त्यावर दोन्ही पंचानी सहया केल्या.

त्यानंतर शासकीय पंचा समक्ष तक्रारदार किसनराव नायक यांनी सांगितले की, मी आज त्यांना मोबाईलव्दारे

संपर्क केला असता त्यांचा मोबाईल बंद आहे.मी त्यांना उदया दि.13.05.2026 रोजी सकाळी गोरेगाव येथे त्यांची घरी जावुन भेट घेणार आहे.माझे कामासंबंधाने बोलणी करणार आहे असे त्यानंतर पुढील कार्यवाही दि. 13.05.2026 रोजी करावी सांगीतले होते त्यावरुन सविस्तर तक्रार पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानंतर दि.13.05.2026 रोजी तक्रारदार किसनराव नायक हे लाप्रवि कार्यालय,हिंगोली येथे हजर आले असता त्यावेळी लाचमागणी पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने सापळा पथकातील सदस्य,पंच व तक्रारदार यांना मी थोडक्यात सुचना देवुन लाचमागणी पडताळणी गोरेगाव येथे जावुन करण्याचे ठरविले.

त्यानंतर आम्ही सापळा पथकासह ला.प्र.वी.कार्यालय, हिंगोली येथुन निघुन गोरेगाव येथे अंदाजे 11.25 वा. पोहचलो. आमच्या सुचनेवरून पोशि पुंडगे यांनी तक्रारदार व दोन्ही पंचाना व्हाईस रेकॉर्डर बाबत व त्यामध्ये वापरण्यात येणा-या मेमरीकार्ड बाबत माहिती दिली. माझे सुचनेवरुन पोशि पुंडगे यांनी व्हाईस रेकॉर्डर अंदाजे 11.39 वा. सुरू करून तक्रारदार श्री नायक यांचे अंगातील बनियनच्या आतील बाजुस कापडी पिशवीत टाकुन आडकावुन दिला. त्यानंतर तक्रारदार पंच क्र.1 श्री खिल्लारे यांचे सोबत लोकसेवक रामप्रसाद खिल्लारी यांची गोरेगाव येथे भेट घेण्यासाठी त्यांचा पुतण्या राजेश नायक यांची मोटर सायकलने रवाना झाले.

त्यानंतर अंदाजे 11.59 वा. तक्रारदार श्री नायक व पंच क्र.1 श्री खिल्लारे असे मोटर सायकलने पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी पोशि पुंडगे यांनी तक्रारदार श्री नायक यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला. त्यानंतर तक्रारदार श्री नायक व पंच क्र.1 यांना पडताळणी कारवाई दरम्यान घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारपुस केली. त्यावेळी पंच क्र. 1 श्री खिल्लारे यांनी सांगितले की, तक्रारदार व लोकसेवक खिल्लारी यांची गोरेगाव चौफुलीवर पानपटटी जवळ भेट झाली. त्यावेळी लोकसेवक खिल्लारीं,ग्रामसेवक व तक्रारदार यांची तक्रारदार यांचे कामाच्या अनुषंगाने चर्चा झाली. चर्चेदरम्याण लोकसेवक खिल्लारी यांनी तक्रारदार नायक यांना म्हणाले की,आणले का पैसे तुम्ही...त्यावर तक्रारदार म्हणाले की,किती दयाला लागतात.... तेव्हा लोकसेवक खिल्लारी म्हणाले की,दया ना.... काही दोन तीन हजार ...काय दयायचे ते.... त्यावर तक्रारदार नायक म्हणाले की, दोन तिन हजार ... काही कमी जास्त... तेव्हा चार पाचशे कमी दया....अ.... असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे त्यांचे काम करून देण्यासाठी 2,500/- रूपयाची लाचेची मागणी करुन लाच रक्कम आजच स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर तक्रारदार यांच्या सांगण्याप्रमाणे लोकसेवक खिल्लारी,ग्रामसेवक यांची गोरेगाव जाणा-या चौफुलीवर भेट होईल असे सांगितल्याने लोकसेवक खिल्लारी,ग्रामसेवक यांच्या विरुध्द गोरेगाव जाणा-या चौफुली येथे सापळा कारवाई आजमावण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी सापळा पुर्व कारवाईला सुरवात केली.पोह श्री अकबर शेख यांनी तक्रारदार व दोन्ही पंचासमक्ष अँन्थ्रॉसिन पावडर व अल्ट्राव्हॉयलेट लॅम्पच्या गुणधर्माबाबत माहिती देवुन प्रात्यक्षिक करून दाखविले.त्यानंतर आम्ही सापळा कारवाईच्या अनुशंगाने तक्रारदार, पंच व सापळा पथकातील अंमलदाराना सुचना दिल्या. लोकसेवक खिल्लारी,ग्रामसेवक यांनी तक्रारदार किसनराव नायक यांचेकडुन लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार यांनी लाच रक्कम स्विकारल्याबाबत इशारा म्हणुन गळयातील मोठा पांढ-या रंगाचे रुमालाने तोंड पुसन उजवे हातात धरणे बाबत तक्रारदार यांना सुचना दिली. त्यानंतर पोह अकबर शेख यांनी लाच रक्कमेला अँन्थ्रॉसिन पावडर लावुन तक्रारदार यांच्या शर्टच्या समोरील छातीवरील डाव्या बाजुच्या खिशात अलगत ठेवुन दिली.

त्यानंतर तक्रारदार यांच्याकडे 12.20 वाजता व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन पंच क्र. 1 खिल्लारे यांच्यासोबत लोकसेवक खिल्लारी यांची भेट घेण्यासाठी तक्रारदार नायक यांना त्याचा पुतण्या राजेश नायक यांचे मोटार सायकलने गोरेगाव चौफुली येथे रवाना केले.त्यांच्या पाठोपाठ काही अंतराने आम्ही व सापळा पथकातील पोलीस निरीक्षक श्री राजेश मलपिलु, सपोउपनि शुक्ला, पोह श्री वरणे, पोशि श्री. पुंडगे, व पंच क्रं.2 श्री वानखेडे असे शासकिय वाहन क्र.एम.एच.38 एडी 4337 ने गोरेगाव जाणा-या चौफुलीकडे रवाना झालो.तेथे गेल्यावर काही अंतरावर तक्रारदार व पंच क्रमांक 1 श्री खिल्लारे हे मोटार सायकलने गोरेगाव चौफुली वरिल हॉटेल अतिथी बार रेस्टॉरन्ट समोर थांबवुन खाली उतरुन, पायी चालत बारमध्ये गेले. त्यावेळी आम्ही व सापळा पथकातील अंमलदार असे हॉटेल अतिथी बार रेस्टॉरन्टच्या थोडया अंतरावर शासकिय वाहन बाजुला उभे करुन तक्रारदार व पंच क्र. 1 खिल्लारे यांच्या पाठीमागे काही अंतराने पायी चालत हॉटेल अतिथी बार रेस्टॉरन्टच्या आवारात जाउन तिथे कोणासही संशय येणार नाही अशा प्रकारे सापळा लावला.तक्रारदार नायक हे अतिथी बार रेस्टॉरन्टमध्ये जावुन लोकसेवक खिल्लारी यांची भेट घेतली असता लोकसेवक खिल्लारी यांनी तक्रारदार यांना रेस्टॉरन्टच्या बाहेर थांबण्यास सांगितले.त्यामुळे तक्रारदार रेस्टॉरन्टचे बाहेर येवुन थांबले. थोडया वेळाने अंदाजे 13.30 वाजता तक्रारदार नायक यांच्याकडुन लोकसेवक खिल्लारी,ग्रामसेवक यांनी पंचासमक्ष स्वतः 2,500/- रु. लाच रक्कम स्विकारली असता, तक्रारदार यांनी त्यांना सांगीतल्याप्रमाणे लाच स्विकारल्या बाबत त्यांनी त्यांच्या गळयातील मोठा पांढ-या रंगाचे रुमालाने तोंड पुसन उजवे

हातात धरून सापळा पथकास इशारा केला. त्यावेळी आम्ही, लोकसेवक खिल्लारी, ग्रामसेवक यांना हॉटेल अतिथी बार रेस्टॉरन्टच्या समोर ताब्यात घेतले. त्यावेळी सापळा पथकातील पोशि पुंडगे यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला. त्यानंतर आम्ही आमचा, पंचाचा व सापळा पथकातील सदस्याचा परिचय देवुन लोकसेवक रामप्रसाद खिल्लारी,ग्रामसेवक यांना त्यांचा नाव, गाव पत्ता विचारला असता त्यांनी रामप्रसाद ज्ञानबाराव खिल्लारी, वय 48 वर्ष, व्यवसाय नौकरी पद- ग्राम विकास अधिकारी,ग्राम पंचायत सवना ता.सेनगाव जि.हिंगोली रा. गोरेगाव ता.सेनगाव जि.हिंगोली असे असल्याचे सांगीतले. त्यानंतर स्विकारलेल्या लाचेच्या रक्कमेबाबत विचारपुस केली असता त्यांनी स्विकारलेली अँन्थ्राँसिन पावडर युक्त 2,500/- रू लाच रक्कम त्यांचे पॅन्टच्या पाठीमागील उजव्या खिशातुन काढुन दिल्याने ती पंचा समक्ष हस्तगत करण्यात आली आहे. सदर बाबत सविस्तर सापळा कारवाई पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी तक्रारदार श्री. किसनराव प्रितमराव नायक, वय 60 वर्ष व्यवसाय शेती रा.सवना ता.सेनगाव जि. हिंगोली यांनी दिनांक 12.05.2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली येथे दिलेल्या तक्रारीवरुन, दिनांक 13.05.2026 रोजी करण्यात आलेला पडताळणी पचंनामा, सापळा पुर्व व सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक रामप्रसाद ज्ञानबाराव खिल्लारी,वय 48 वर्ष, व्यवसाय नौकरी पद-ग्राम विकास अधिकारी,ग्राम पंचायत सवना ता.सेनगाव जि.हिंगोली रा.गोरेगाव ता.सेनगाव जि.हिंगोली यांनी तक्रारदार किसनराव नायक यांना घरकुलाचा संयुक्ती पाहणी अहवालावर स्वाक्षरी करण्यासाठी 2,500/- रु. लाचेची मागणी करून,आज दिनांक13.05.2026 रोजी 13.30 वा.चे सुमारास सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार नायक यांच्याकडुन गोरेगाव चौफुलीवरील हॉटेल अतिथी बार रेस्टॉरन्टच्या समोर 2,500/- रू लाच रक्कम पंचा समक्ष स्वतः स्विकारली आहे.

आरोपी लोकसेवक, रामप्रसाद ज्ञानबाराव खिल्लारी, वय 48 वर्ष, व्यवसाय नौकरी पद- ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत सवना ता.सेनगाव जि.हिंगोली रा.गोरेगाव ता.सेनगाव जि.हिंगोली यांनी तक्रारदार किसनराव नायक यांच्याकडुन स्वताः लाच रक्कम स्विकारली म्हणुन त्यांचे विरुध्द कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
VIKAS MAROTI GANWAT
**Rank** (पद): Dy. SP (Deputy Superintendant **No.**(क्र.): DGPVMGM8101
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):